**सं.फौ.के.नं. १६/२०२१**

**नि. क्र. २८ लगत**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – सचिन सुरेश भुजबळराव,

**वय** – ४८ वर्षे, **हुद्दा** - पो.हे.कॉ. ११७४, **नेमणुक** – लांजा पोलीस ठाणे.

**<u>उर्वरीत सरतपास – अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेतर्फे</u> –**

०९. उर्वरीत तपासकाम श्री. बाईंग यांच्याकडे सुपुर्त करण्यात आले होते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. मी त्याला ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे वकील श्रीम. पी. सी. चव्हाण यांचेकडून शपथेवर सुरु</u> –**

१०. हे म्हणणे खरे आहे की, ज्या वाहनातुन आम्ही प्रोव्ही वॉचकामी रवाना होतो त्याची नोंद देखील लॉगबुकला करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, मी तपासिक अधिका–यांना तशी वाहनाची नोंद केल्या बाबत उतारा दिला नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला लिहीता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी अंगठा उमटवत असतो. हे म्हणणे खरे आहे की, फॉर्म एफ इंग्लीशमध्ये आहे. मी २८ वर्षापासून पोलीस सेवेत आहे. हे म्हणणे खरे आहे की, परीच्छेद क्र.०४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पुढील कार्यवाहीसाठी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, लांजा यांच्या परवानगी बाबतच्या तजवीजा तसेच ठाणे अंमलदारांबाबत बिनतारी संदेश मी केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या बाबतचा मजकुर माझ्या वरीष्ठांनी मला सांगीतल्याप्रमाणे मी सरतपासात नमुद केला.

१२. हे म्हणणे खरे आहे की, उपविभागीय पोलीस अधिकारी, लांजा यांची परवानगी घेण्यापुर्वी कार्यकारी दंडाधिकारी यांच्या समक्ष पंचनामा करावयाचा असल्याने दोन पंच मिळवण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला. मला उपविभागीय पोलीस अधिकारी, लांजा यांची परवानगी कीती वाजता मिळाली हे आठवत नाही. हे

मला माहीती नाही की, परवानगी मिळाल्या बाबतचा कागदोपत्री पुरावा याकामी दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, परवानगी मिळाल्या बाबत खात्री न करताच मी याकामी फिर्याद दाखल केली आहे. पोलीस निरीक्षकांनी फोनव्दारे तशी उपविभागीय पोलीस अधिका–यांची परवानगी घेतल्याचे तोंडी सांगीतल्याने पुढील कारवाई करण्यात आली. साक्षीदार सांगतो की, बिनतारी संदेश प्राप्त झाला होता हे मी मला समजले होते. मी तोंडी संदेश प्राप्त झाला होता, बिनतारी संदेश देखील मिळाला होता या बाबतची व्यक्तीशः खात्री केली नव्हती.

१३. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनास्थळाजवळचे स्थानिक पंच आम्हाला मिळू शकत होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सदर व्यक्तीला अंगझडती घ्यायला सांगीतली मात्र त्याने नकार दर्शवला असा कागदोपत्री पुरावा नाही. साक्षीदार सांगतो की, कागदपत्रांमध्ये नोटीस दाखल केलेली आहे. साक्षीदार सांगतो की, आरोपीने आम्हाला तोंडी, अंगझडती घ्यायला नकार दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने आम्हाला अंगझडती घेण्याबाबत नकार दिल्याबाबत लेखी पुरावा कुठेही नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये, आरोपीने आम्हाला अंगझडतीस तोंडी नकार दिला असे कुठेही नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आम्हाला अंगझडतीस तोंडी नकार दिला हे मी खोटे नमुद केले आहे.

१४. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कथनानुसार मुद्देमालाची किंमत २२५०/– अशी कोणी, कुठे आणि कधी केली या बाबत पुरावा माझ्याकडे उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये एका ठिकाणी गांजा या अंमली वनस्पतीचा सुकलेल्या पाल्याचे प्लॅस्टीक पिशवीसह डिजीटल वजन काट्यावर वजन एकुण **०.१४९ ग्रॅम** असे व एका ठिकाणी भगव्या रंगाची सार्दळ कलेक्शन अशी लिहीलेली कॅरीबॅग त्यामध्ये १५ पारदर्शक बंद प्लॅस्टीकचे पाऊच, प्रत्येक पाऊचमध्ये या अंमली पदार्थाचा सुकलेला पाला असून त्या सर्व १५ पाऊचचे एकत्रीत वजन एकुण **१४९ ग्रॅम** असे नमुद आहे.

१५. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये अंमली वनस्पतीचा सुकलेला पाल्याची पारदर्शक पिशवी असे नमुद आहे व माझ्या सरतपासात पारदर्शक पाला भरलेल्या प्लॅस्टीकच्या पिशव्या असे नमुद आहे.

१६. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनास्थळ हे देवरुख रत्नागिरी रस्त्यालगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनास्थळ हे भरवस्तीतील ठिकाण आहे तसेच तीथे आठवडा बाजार बसतो. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनास्थळ हे देवरुख आणि संपुर्ण पंचक्रोशीचा आठवडा बाजार आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठिकाणी बाजारामुळे अनेक प्लॅस्टीकच्या पिशव्या पडलेल्या असु शकतात. हे मला माहीती नाही की, गाडीचे सर्हीसींग सेंटर असल्यामुळे रोज २५ ते ३० गाड्या तीथे सर्हीसींगला आलेल्या असतात.

१७. हे म्हणणे खरे आहे की, गांजा हा अंमली पदार्थ बघुन ओळखता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गांजा ही वनस्पती नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाजवळचे घर हे आरोपीचे असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला ताब्यात घेतले त्यावेळी सुर्यास्त झाला होता.

१८. हे मला आठवत नाही की, आरोपी विरुध्द केलेल्या कारवाईचे रिपोर्ट डिवायएसपी ऑफीसला पाठवले अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या तथाकथीत वजनकाटा मापकाने वजन केले तो याकामी जप्त केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद दाखल केल्यानंतर त्याची प्रत आरोपीला दिल्याचे नमुद फिर्यादीत नाही.

**उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत आरोपीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीनुसार तहकुब करणेत आला.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.01.17 18:33:19 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – १७/०१/२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**